दैनिक अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक २६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.२७ एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### लोडशेडिंग आणि सक्तीची वीजवसुली थांबवा..

# पनवेल भाजपाचे राज्य सरकार विरोधात 'कंदील' आंदोलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**अघोषित लोडशेडिंग आणि वीजवसुलीच्या विरोधात भाजपा आक्रमक झाली आहे. पनवेल शहर भाजपाकडून सोमवारी सायंकाळी पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाविकास आघाडी सरकारच्या निषेधार्थ भाजपाने उत्तर रायगड जिल्हाध्यक्षग आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली 'कंदील आंदोलन' केले.**



यावेळी राज्य सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी देण्यात आली. यावेळी लोडशेडिंग आणि सक्तीची वीजवसुली थांबवण्याची मागणी यावेळी भाजपा कार्यकर्त्यांकडून करण्यात आली.सरकारला शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला वेळ नसल्याची टीका यावेळी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांकडून करण्यात आली. महावितरण कंपनीच्या अघोषित भारनियमनाच्या विरोधात घोषणाबाजीही करण्यात आली. या आंदोलनात आमदार प्रशांत ठाकूर, महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, शहराध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, नगरसेवक तेजस कांडपिळे, नगरसेविका दर्शना भोईर, हेमलता म्हात्रे, रुचिता लोंढे, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, शिक्षक सेलचे जिल्हाध्यक्ष के. सी. पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, शहराध्यक्ष रोहित जगताप, भाजपचे शहर सरचिटणीस अमरीश मोकल, संजय जैन, गोपीनाथ मुंढे, माधुरी कोडरू, अभिषेक भोपी, किशोर सुरते, केदार भगत, यांच्यासह भाजप कार्यकर्ते यांच्यासह पनवेलकरसहभागी झाले होते.

यावेळी पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी महाविकास आघाडीच्या सरकारवर टीकेची झोड उठविताना सांगितले की, गेल्या सुमारे तीन आठवड्यांपासून राज्यात विजेचा खेळखंडोबा सुरू आहे. सरकारी कार्यालयांची हजारो कोटींची थकबाकी, सामान्य ग्राहकांच्या थकबाकी वसुलीसाठी वीज कापण्याची कारवाई, ढिसाळ व्यवस्थापनामुळे निर्माण झालेली कोळशाची टंचाई, ऐन उन्हाळ्यात सक्तीने बंद ठेवलेली वीजनिर्मिती संयंत्रे अशा बेदरकार कारभारामुळे राज्याचे वीज व्यवस्थापन कोलमडले आहे. विजेची मागणी कमी असतानाच्या काळात करावयाची देखभाल दुरुस्तीची कामे ऐन उन्हाळ्यात हाती घेऊन सरकारने वीजटंचाईच्या समस्येत भर घातली आहे. तसेच सरकारी कार्यालयांची बिले थकविणारे व ग्राहकांची लुबाडणूक करणारे आघाडी सरकार हेच असून तातडीने थकबाकीची रक्कम वीज मंडळास देऊन वाढीव सुरक्षा अनामत वसूल करण्याचा निर्णय ताबडतोब मागे घ्यावा, असा इशारा यावेळी परेश ठाकूर यांनी दिला. यावेळी सरकारच्या बेशिस्तीमुळे वीज मंडळाचा कारभार ढासळला आहे. तसेच देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजपचे सरकार सत्तेवर असताना भारनियमनमुक्त असलेल्या महाराष्ट्रावर आघाडी सरकारने पुन्हा वीजटंचाई लादली, असा आरोपही भारतीय जनता युवा मोर्चाचे उत्तर जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी केला.

> देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश विविध क्षेत्रात आघाडी घेत आहे. पण जे जे भाजप करेल त्याच्या उलट करण्याचे ठरवल्यामुळे महाविकास आघाडी प्रत्येक पातळीवर अपयशी ठरतंय. कोळशाचा तुटवडा होत असताना बाकीची राज्ये उपाययोजना करीत होती. मग महाराष्ट्राला काय अवघड होते. विविध रिपोर्ट सांगतायत कि, या स्थितीमध्ये महाराष्ट्राला सर्वात जास्त कोळसा देण्याचे काम केंद्राकडून झाले आहे पण या महाविकास आघाडी सरकारला कृत्रिम टंचाई निर्माण करायची होती व त्या अनुषंगाने महागड्या दराने वीज खरेदी करायची होती, खिसे भरायचे होते आणि या उद्देशाने टंचाई होऊ दिली. त्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणी कुठे घोषित तर अघोषित भारनियमन सुरु आहे. वीज महागड्या दराने खरेदी त्याची वाढीव दराने ग्राहकांना बिले देण्यात येत आहे त्यामुळे जनता प्रचंड संतापली आहे. या जनतेच्या वतीने हे कंदील आंदोलन केले आहे. वीज ग्राहक हा वीज वितरणाचा कायमचा ग्राहक आहे, आणि त्याला स्पर्धा नाही आहे कि तो दुसऱ्या कडून वीज खरेदी करेल अशा स्थितीत सुरक्षा अनामत रक्कम घेणे अन्यायकारक आहे, त्यामुळे त्याचा व भारनियमनचा आणि महाविकास आघाडीचा आम्ही निषेध करतो.
>
> **-आमदार प्रशांत ठाकूर**

## वाढती महागाई व आ.जिग्नेश मेवाणींच्या अटकेचा पनवेल काँग्रेसने केला निषेध



**दै.रायगड नगरी । पनवेल**

केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे पेट्रोल डिझेल दररोज वाढत असलेले दर त्यामुळे होणारी महागाई याचा जाहीर निषेध करण्यासाठी व काँग्रेस पक्षाचे गुजरात येथील दलित चेहरा म्हणून उदयास आलेले आमदार जिग्नेश मेवाणी यांना बेकायदेशीररित्या केलेली अटक याचा निषेध करण्यासाठी आज रोजी पनवेल शहर जिल्हा काँग्रेसच्यावतीने निषेध मोर्चा काढून प्रांताधिकार्यांना निवेदन देण्यात आले.

पनवेल शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष आर. सी. घरत यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात मोदी सरकार विरोधात घोषणा देणारी रिक्षा जनतेचे लक्ष वेधून घेत होती. या मोर्चात महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष कॅप्टन कलावत, पनवेल शहर जिल्हा सरचिटणीस मल्लिनाथ गायकवाड, माजी जि. प अध्यक्ष अनंत पाटील, पनवेल शहर जिल्हा महिला अध्यक्षा निर्मला म्हात्रे, पनवेल शहर जिल्हा अनुसूचीत जाती विभाग अध्यक्ष मोहन गायकवाड, पनवेल शहर जिल्हा युवक अध्यक्ष हेमराज म्हात्रे, नागसेविका मंजुळा कातकरी, पूजा मोहन, सुधीर मोरे, विश्वनाथ चौधरी, विजय केणी, नीता शेणोय, जयश्री जळगावकर, किरण तळेकर, आशुतोष, सागर पगारे, जोश जेम्स व अनेक काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रांताधिकार्यांना निवेदन देण्यापूर्वी प्रांत कार्यालयासमोर मोहन गायकवाड, हेमराज म्हात्रे, कॅप्टन कलावत, निर्मला म्हात्रे, मल्लिनाथ गायकवाड व जिल्हा अध्यक्ष आर. सी. घरत यांची समयोचित भाषणे झाली या भाषणांमधून आ. जिग्नेश मेवाणी यांची झालेली बेकायदेशीर अटक व वाढती महागाई यांचा निषेध करण्यात आला.

## पोलादपूर तालुक्यात वादळीवाऱ्याचा जोरदार तडाखा



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील महाडलगतच्या ग्रामीण भागात सोमवारी सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्याने अनेक लोकवस्त्यांना जोरदार तडाखा दिल्याने आर्थिक हानी झाल्याचे दिसून आले. लोहारे, तुर्भे तसेच सवाद धारवली सप्तक्रोशी भागातील वावे याठिकाणी इमारतींचे नुकसान झाल्याचे तहसिल कार्यालयाकडून सांगण्यात आले. सुदैवाने कोठेही मनुष्यजीवित हानी झाली नाही.

पोलादपूर तालुक्यात सोमवारी संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास अचानक ढग दाटून येऊन सोसाट्याचा वारा सुटला आणि वादळी वाऱ्याने धुळीचे लोट मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या काँक्रीटच्या रस्त्यावरून उध–ळले गेले. यामुळे काही काळ वाहनांना कमी वेग ठेऊन प्रखर प्रकाशझोतामध्ये सायंकाळी पाच वाजल्यानंतर वाहने चालवावी लागली. याचदरम्यान, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगत शेलार ढाब्याच्या नवीन आकर्षक इमारतीची एक भिंत वादळी वाऱ्याचा प्रवाह वाढल्याने कोसळली. यावेळी हॉटेलबाहेर उभ्या असलेल्या तीन मोटारसायकलींवर भिंतीतील जांभा दगड पडल्याने मोटारसायकलींची हानी झाली. यावेळी तुर्भे बुद्रुक भिकू गणपत पवार यांचे राहते घराचे पत्रे वादळी वाऱ्यामुळे उडाले तर तुर्भे बुद्रुक मंदिर पत्र्याचे नुकसान झाले. सवाद धारवली सप्तक्रोशी विभागातही वावे गावात घराचे पत्रे उडाल्याच्या घटनांनी अनेकांचे .../२

### संक्षिप्त...

## ३ मे रोजी राज्यात काहीही घडू शकते : प्रकाश आंबेडकर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मशिदींवरील भोंगे हटवण्याच्या अजेंड्यावर ठाम भूमिका घेतल्यानंतर मनसे पुन्हा एकदा चर्चेत आहे. राज ठाकरे यांनी ३ मे पर्यंत अल्टिमेटम दिलेला असून, १ मे रोजी औरंगाबाद येथे सभा होणार आहे. मात्र, राज ठाकरेंच्या औरंगाबाद दौऱ्यापूर्वीच औरंगाबाद पोलिसांनी शहरात जमावबंदी आदेश लागू केले आहेत. त्यामुळे राज ठाकरेंची सभा होणार की नाही, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज ठाकरेंच्या शिवतीर्थ या निव–ासस्थानी मनसेच्या पदाधिकाऱ्यांची आज बैठक झाली. या बैठकीनंतर औरंगाबादमध्ये राज ठाकरेंची सभा शंभर टक्के होणार असल्याची माहिती मनसेचे नेते नितीन सरद–साई यांनी दिली. आमच्या सभेची पूर्वतयारी उत्तम प्रकारे सुरु आहे. औरंगाबादसह मराठवाड्यामध्ये राज ठाकरेंच्या सभेची उत्सुकता दिसून येत आहे. पोलिसांनी अजूनही सभेला परवानगी दिलेली नाही. मात्र येत्या १–२ दिवसांत पोलिसांची परवानगी मिळेल, असं नितीन सरदेसाई यांनी सांगितलं. राज ठाकरेंच्या सभेची चर्चा सुरु असताना, वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी १ मे रोजी शांती मार्च काढणार असल्याचे जाहीर केले आहे. मनसे, भाजपा आणि राज्य सरकारची भूमिका पाहता, ३ मेला राज्यात काहीही घडू शकतं, अशी शंका त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे आम्ही शांती मार्च काढणार असल्याचं प्रकाश आंबेडकरांनी सांगितलं. तसेच या मार्चमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाला थारा नसून विविध संघटनेचं स्वागत केलं जाईल, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

## भेंडखळ खाडीत सोडण्यात येणाऱ्या दुषित पाण्यामुळे हजारो मासे मृत्युमुखी ; प्रशासनाचे दुर्लक्ष



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्याला दिवसेंदिवस औद्योगिकीकरणात झपाट्याने वाढत होत आहे. परंतु वाढत्या औद्योगिकीकरणातील दुषित पाणी सध्या मोठ्या प्रमाणात समुद्रात सोडले जात आहे. त्यामुळे किनाऱ्यावरील खाडीतील व गावोगावच्या नाल्यातील पाणी दुषित होत आहे. त्यामुळे समुद्रातील, खाडी किनाऱ्यावरील विविधप्रकारच्या जातींचे मासे हे मुत्यू अवस्थेत पडण्याच्या घटनेत वाढ होत आहे. सदर घटनांकडे प्रकल्प व्यवस्थापन, महसूल, सिडको, मत्स्य आणि प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी हे कानाडोळा करत असल्याने अशा दुषित पाण्याच्या व मेलेल्या माशांच्या उग्र वासाने भेंडखळ गावातील रहिवाशांच्या आरोग्याचा प्रश्न गहन बनला आहे.



उरण तालुक्यात केंद्र व राज्य शासनाच्या अधिपत्याखाली असलेल्या अनेक प्रकल्पातील दुषित, केमिकल मिश्रीत दुषित पाणी हे समुद्राच्या पाण्यात सोडले जात आहे. त्यामुळे वारंवार समुद्रातील मासे हे नागाव, जसखार, धुतूम, चिर्ले, बांधपाडा ग्रामपंचायत हद्दीतील खाडी किनाऱ्यावर मुत्यूमुखी पडत असल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. त्यामुळे मासेमारी करणाऱ्या बांधवांवर उपासमारीचे संकट ओढावत आहे. त्यात समुद्रात, नाल्यात जाणाऱ्या ज्वलनशील पदार्थांमुळे नागाव व जेएनपीटी परिसरात आगी लागण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. अशा गंभीर समस्येकडे प्रकल्प व्यवस्थापन, महसूल, सिडको, मत्स्य आणि प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी हे काणाडोळा करतअसल्याचे निर्दशनात येत आहे.

शासकीय प्रशासनाच्या अशा ढिसाळ कारभाराचा फायदा उठवत सध्या भेंडखळ आणि बांधपाडा ग्रामपंचायत हद्दीतील कंटेनर यार्डच्या व्यवस्थापनाने सदर ग्रामपंचायत हद्दीतील समुद्राच्या खाडीत विषारी केमिकल मिश्रीत पाणी सोडण्याचा धाडसी निर्णय घेतल्याने मागील काही दिवसांपासून खाडीतील, नाल्यातील विविध जातींचे मासे मुत्यू मुखी पडत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. एकंदरीत यांचा फटका हा मासेमारी करणाऱ्या बांधवांना सहन करावा लागत आहे. तसेच खाडीतील .../२

## सीकेटी महाविद्यालयाचा (स्वायत्त) पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ मोठ्या उत्साहात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) मधील पदवी आणि पदव्युत्तर वर्षाच्या वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळा मंगळवारी (दिनांक २६ एप्रिल) समारंभपूर्वक पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल अ. पवार उपस्थित होते.

या प्रसंगी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, रामशेठ ठाकूर कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. सी. मराठे आणि संस्थेचे सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती या सोहळ्याला लाभली. या प्रसंगी प्रभारी प्राचार्य मा. प्रो. डॉ. एस. के. पाटील आणि आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स विद्याशाखांचे प्रमुख आणि विविध विभागांचे प्रमुख मंचावर मान्यवरांसोबत उपस्थित होते.

या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी, विद्यार्थ्यांचे कोविड–१९ च्या कारकिर्दीतही उल्लेखनिय यश संपादन केल्याबद्दल कौतुक केले. हा दिवस शिक्षक आणि पालक यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे असे विद्यार्थ्यांना त्यांनी संबोधित केले. या संस्थेने विद्यार्थ्यांना फक्त पुस्तकी ज्ञान न देता त्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल याविषयी देखील मार्गदर्शन दिले असे संस्थेचे कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशुन असे सांगितले की, .../२

## सिडकोच्या अतिक्रमण विरोधी कारवाईला महाविकास आघाडीसह ग्रामस्थांनी केला विरोध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली वसाहतीमधील काही ठिकाणी असलेले बांधकाम पाडण्यासाठी आज सिडकोचे अतिक्रमण विरोधी पथक आले असता त्याला आज महाविकास आघाडीसह ग्रामस्थांनी जोरदार विरोध केला.



शिवसेना, शेकाप, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, समाजवादी पार्टी आदींच्या महाविकास आघाडीने आज सिडकोच्या कारवाईला विरोध करत कारवाई थांबवली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील, नगरसेवक रवींद्र भगत, नगरसेवक गोपाल भगत, समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अनिल नाईक, शिवसेना महानगर समन्वयक दीपक घरत, तालुकाप्रमुख एकनाथ म्हात्रे, तालुका संघटक भरत पाटील, विधानसभा संघटक दीपक निकम, महानगरप्रमुख रामदास शेवाळे, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, शहर प्रमुख डी. एन. मिश्रा, शहर संघटक अरविंद कडव, शहर समन्वयक गिरीश धुमाळ, खांदा वसाहत शहरप्रमुख सदानंद शिर्के यांच्यासह मोठ्याप्रमाणात महाविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते. जी जागा सिडकोकडे अद्याप हस्तांतरण झालेली नाही त्या जागेवर सिडको आपला हक्क सांगत बांधकामे .../२

# भ्रमाकडून संभ्रमाकडे

साहित्यिकाने राजकीयदृष्ट्या सजग असले पाहिजे, त्याने निर्भीड होऊन स्पष्टपणे व्यक्त झाले पाहिजे, या अपेक्षांच्या पार्श्वभूमीवर ९५व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांनी घेतलेल्या थेट राजकीय भूमिकेचे सार्थ कौतुक झाले. साहित्य संमेलनांचे 'नेहमीचे यशस्वी उद्घाटक' शरद पवार यांच्या भाषणातही राजकीय टिका-टिप्पणी होणे साहजिक होते; परंतु संमेलन संपता संपता त्याचे रूपांतर साहित्यिक मंथनाऐवजी राजकीय भाषणबाजीत झाल्याचे एकूण घडामोडींवरून लक्षात येते. साहित्यिकाने नेहमीच प्रस्थापितांच्या विरोधात भूमिका घेतली पाहिजे, अशी अपेक्षा केली जाते आणि ती योग्यही आहे; मात्र सध्या राजकीयदृष्ट्या राज्यातले प्रस्थापित वेगळे आणि केंद्रातले प्रस्थापित वेगळे आहेत; त्यामुळे नेमकी कोणत्या प्रस्थापिताविरोधात भूमिका घ्यायची याचा निर्णय घेताना, साहित्य संमेलन 'राजकीय' होऊन एका बाजूला झुकल्याचे दिसले. सासणे यांनी त्यांच्या भाषणात 'भ्रमयुगा'चा उल्लेख केला होता; परंतु साहित्याशी संबंधित विषयांचा ऊहापोह होईल, काही साहित्यिकांच्या भूमिकांविषयी मंथन होईल या अपेक्षेने आलेल्या साहित्यप्रेमींना, आपण साहित्याच्या मांडवात आलो आहोत की राजकारणाच्या, अशा 'संभ्रमयुगा'चा अनुभव घ्यावा लागला. जत्रा म्हणा किंवा काहीही म्हणा, अशा प्रकारे साहित्याच्या मांडवाखाली हजारो लोक एकत्र येतात, चर्चा करतात, तासन् तास कवितांची सत्रे चालतात, हे साहित्यासाठी पोषक वातावरण तयार होण्यासाठी आवश्यकच असते; परंतु संमेलन संपल्यावर साहित्यविषयक चर्चा मागे पडून, तोंडात केवळ राजकीय चव राहत असेल, तर ते योग्य नाही. संमेलनाच्या पहिल्या दिवशी स्पष्ट झालेला राजकीय कल आणि वातावरण अखेरच्या दिवसापर्यंत कायम राहिले. संमेलनाच्या स्मरणिकेतही राज्यपालांच्या एका विधानाचा समाचार घेण्यात आला. यासंबंधी स्वागत मंडळाशी झालेल्या वादाचा संदर्भही प्रसिद्ध झालेल्या बातम्यांमध्ये होता. धार्मिक आणि जातीय तणाव निर्माण करणे, ही आपल्या देशातील राजकारण्यांची 'राजकीय हत्यारे' आहेत. या हत्यारांना साहित्यिक संस्थांनी आपले व्यासपीठ देऊ नये. राजकीय स्थितीविषयी चिंतन करणे, चिंता करणे वेगळे आणि त्याच राजकारण्यांना आपला वापर करू देणे वेगळे. चिंता व्यक्त करणे, हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भाग होय; परंतु कोणत्याही विशिष्ट विचारसरणीचा वरचष्मा राहील असे पाहणे, हा त्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा स्वतःच करून घेतलेला संकोच होय. जेम्स लेनचे छत्रपती शिवाजी महाराजांवरील पुस्तक दोन दशकांपूर्वी प्रसिद्ध झाले, तेव्हाच अवघ्या महाराष्ट्राने 'आमच्या श्रद्धास्थानाविषयी वाटेल ते लिहिलेले खपवून घेतले जाणार नाही,' हे खणखणीतपणे सांगून झाले होते. त्या भूमिकेत कोणताही बदल होण्याचा संभव नाही. राज ठाकरे यांनी राजकीय कारणास्तव तो मुद्दा आता उकरून काढला आहे; तेव्हा एवढ्या वर्षांनंतर आता जेम्स लेनच्या निषेधाचा ठराव मांडून संमेलनाने राजकारण्यांच्या कच्छपी लागण्याचे कारण नव्हते. साहित्य संमेलनाच्या एकूण आयोजनात, दृष्टिकोनात ताजेपणा आणण्याची, चर्चांमधील तोचतोपणा संपवण्याची आता नितांत गरज आहे. त्याच वेळी, ठराव करण्यासारख्या निरर्थक उपचारांचाही फेरविचार करण्याची गरज आहे. 'महाराष्ट्र टाइम्स'ने अलीकडेच संमेलनातील जुनेपणाविषयी लेख प्रसिद्ध केला होता, तो त्याच हेतूने. वर्षानुवर्षे एकाच पद्धतीने, त्याच त्याच विषयांवर होत असलेल्या परिसंवादांना फाटा देऊन, ज्यातून काही तरी भरीव होईल असे उपक्रम आता संमेलनाने केले पाहिजेत. चर्चांमध्ये प्रत्येक वक्त्याला साधारण दहा ते पंधरा मिनिटे मिळतात. वक्ता कितीही अभ्यासू असला, तरी त्याला 'टाळी घेणाऱ्या' चार-दोन वाक्यांपेक्षा अधिक काही बोलता येत नाही; त्यामुळे अशा परिसंवादांपेक्षा मुलाखतींची संख्या वाढवणे आणि साहित्याच्या क्षेत्रात काही नवे करू पाहत असलेल्यांना थेट रसिकांशी संवाद साधण्याच्या अधिक संधी देणे, हे व्हायला हवे. लेखक, प्रकाशक, वितरक आणि वाचक या चार घटकांना एकत्र आणून, त्यांच्यात मंथन घडवून आणायला हवे. मराठी साहित्य कुठे कमी पडते किंवा ते फक्त शहरी आहे, फक्त ग्रामीण आहे, मराठीतून विनोद हरवला आहे का, अशा चर्चांमधून गेल्या ९५ संमेलनांत काहीही घडून आलेले नाही. आज वाचकांची वाचावयाची व्यासपीठे बदलली आहेत. फेसबुक, व्हॉट्सअॅप यांसारखी माध्यमे आहेत, त्यावरही मराठी खूप वाचले जाते, पुस्तकांची ऑलनाइन विक्री वाढली आहे, हे कुठलेही विषय संमेलनाच्या पत्रिकेत स्थान मिळवताना दिसत नाही. साहित्याने वर्तमानाची दखल घ्यावी अशी अपेक्षा केली जाते, तेव्हा ती केवळ राजकीय-सामाजिक बदलांची दखल नव्हे, तर अशी चौफेर घेतली गेली पाहिजे. गेली कित्येक वर्षे संमेलनात मराठीला राजभाषेचा दर्जा मिळावा यासाठीचे ठराव केले जात आहेत; मात्र संमेलनात सहभागी एकही राजकीय नेता त्याचा दिल्लीपर्यंत पाठपुरावा करण्यासाठी स्वतःची ताकद किंवा पत वापरत नाही. संमेलन हे साहित्याचे असते, भाषेचे असते, ग्रंथ प्रसाराचे, ग्रंथ व्यवहाराचे असते याचे भान ठेवले जाणे आवश्यक आहे; अन्यथा 'भ्रमयुगा'चे रूपांतर 'संभ्रमयुगा'त व्हायला वेळ लागणार नाही.

# देशाच्या प्रगतीसाठी काम करताना पुरस्काराची आशा न बाळगता समाजसेवा करण्याचा संकल्प करा : राज्यपाल

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आपल्या देशाच्या प्रगतीसाठी काम करताना पुरस्काराची आशा न बाळगता समाजसेवा करण्याचा संकल्प करा, असे आवाहन राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी केले.

राज्यस्तरीय स्काऊट गाईड पुरस्कार प्रमाणपत्र श्री. कोश्यारी यांच्या हस्ते शिवाजी पार्क येथील स्काऊट गाईड पॅव्हेलीयन येथे प्रदान करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड्सचे अध्यक्ष सुनील केदार, क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री कु. आदिती तटकरे, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे आयुक्त ओम प्रकाश बकोरिया यांची प्रमुख उपस्थिती होती.

राज्यपाल भगत सिंह कोश्यारी म्हणाले, स्काऊट गाईडमध्ये काम करताना प्रमाणपत्र अथवा पुरस्काराची आशा न बाळगता समाजसेवा करावी. समाजसेवा केल्यानंतरचे जे आशीर्वाद मिळतात ते पुरस्कारापेक्षा खूप महत्त्वाचे असतात. या पुरस्काराने सर्वांना प्रोत्साहन मिळेल. आज तुम्ही राज्यपालांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारला, यापेक्षा अधिक चांगले काम केल्यानंतर राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार स्वीकाराल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रार्थना न करता प्रार्थनेमधील अर्थांची स्वतःच्या जीवनात अंमलबजावणी करा. काम करताना ते मनापासून उत्तम करण्याचा प्रयत्न करा. महाराष्ट्र राज्य हे स्काऊट गाईडच्या माध्यमातून समाजसेवक घडविण्यात देशात प्रथम स्थानी आहे. सामजिक जाण, सहकार्य, शांती, अहिंसा व सत्य हे गुण अखंडपणे जोपासणे गरजेचे आहे. त्यासाठी स्काऊट गाईडने आजवर योगदान दिले आहे. राज्यात अतिदुर्गम भाग असलेल्या ठिकाणी या चळवळीतून मुलांवर खूप चांगले संस्कार घडविले जाऊ शकतात असे त्यांनी सांगितले. यानिमित्ताने आपल्या शालेय जीवनातील स्काऊट गाईडच्या आठवणींना उजाळा देत राज्यपाल यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री कु.आदिती तटकरे म्हणाल्या, उमेदीच्या वयामध्ये शालेय जीवनात झालेले लोकसेवेचे संस्कार हे भविष्यात दिर्घकालीन उपयुक्त ठरतात. स्काऊट गाईडच्या माध्यमातून झालेला कोणताही शिस्तबद्ध कार्यक्रम हा वेगळ्या उंचीवर नेणारा असतो. अभ्यासक्रमाहून वेगळी चळवळ आणि त्यातील लोकसेवेच्या भावनेचा गौरव या माध्यमातून होत आहे. फ्री बिईंग मी सारख्या चळवळीतून विद्यार्थिनींना व महिलांना सक्षम करण्यासाठी स्काऊट गाईड चळवळ महत्त्वाची ठरते, असे म्हणून राज्यमंत्री कु. तटकरे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. पुरस्कार सोहळ्याचे प्रास्ताविक करतांना क्रीडा आयुक्त ओम प्रकाश बकोरिया म्हणाले, राज्याच्या स्काऊट गाईड चळवळीमध्ये उल्लेखनीय कार्य करतांना या विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक उपक्रमांतून नागरिकांना सेवा व सहकार्य केले आहे. कोरोनाच्या महामारी काळात शाळा व महाविद्यालये बंद असतांना या चळवळीच्या माध्यमातून आपल्या स्तरावर सामाजिक बांधिलकी जपण्याची भूमिका या पुरस्कार प्राप्त व चळवळीतील सहभागी विद्यार्थ्यांनी जपली आहे. सामाजिक बदलासाठी शिस्तीच्या माध्यमातून उत्तम पायाभरणी स्काऊट गाईड चळवळ करीत आहे. ही चळवळ व्यापक करण्यासाठी अधिकाधिक उपक्रम स्काऊट गाईच्या माध्यमातून भविष्यात राबविले जातील, असे श्री.बकोरिया यांनी सांगितले.



# वनविभागाच्या आशीर्वादाने तळा तालुक्यात अवैध लाकूड तोड

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यात मोठ्या प्रमाणात जंगल तोड विनापरवाना होत असून वाहतूक ही केली जात आसल्याचे दिसत असून वनविभागाच्या वरदहस्त असल्याने राजरोज पणे केली जात आहे. लाकूड व्यवसायीक एका परवान्यावर अनेक ठिकाणी मालकीच्या जागेत साग, कींजळ, आईन, खैर तोडून मूळ मालकाला न कळवता मध्यस्थीच्या मार्फत तोड केली जात आहे.

व्यापारी बिनधास्तपणे जंगल तोड करून निसर्गाचा र्हास होत आहे. त्याबरोबर महसूल मोठ्या प्रमाणावर बुडाला जात आहे. वनरक्षक वनक्षेत्र पाल, वनपाल अधिकारी नक्की करतात तरी काय? असा सवाल केला जात आहे. शासनाच्या झाडे लावा, झाडे जगवा हे फक्त घोषणाच म्हणावी का असे शेतकरी व सर्व सामान्य जनतेतून सुर निघत आहे. याबाबत विभागीय वनपरिक्षेत्र कार्यालय रोहा व माणगांव यांनी संबधितांवर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे. वनविभागाच्या बोथट मानसिकते विरोधात वृक्ष प्रेमींकडुन व स्थानिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान जंगल संपत्तीचा ठेकेदारांकडून उध्दवस्त केला जात आहे. याला वनक्षेत्रपाल वनरक्षक जबाबदार आहेत. याची चौकशी करावी व संबधितांवर गुन्हे दाखल करावे त अशी मागणी केली जात आहे.



# आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तहसीलदार घारे यांनी केली दरडग्रस्तभागाची पाहणी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या आदेशानुसार तहसीलदार समीर घारे यांनी आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर म्हसळा तालुक्यातील दरडग्रस्त भागात भेट देऊन दरडग्रस्त गावे मरियमखार, महंमदखणी खार, वावे, शेख मोहल्ला, लिपणी आदि गावांना भेट देऊन ग्रामस्थाशी चर्चा केली.पावसाळ्यात होणाऱ्या अतिवृष्टी मुळे या भागात मोठया प्रमाणात दरडी कोसळण्याचे प्रकार घडतात. अश्या वेळी ग्रामस्थांनी घाबरून न जाता सतर्क रहाणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले.

तशी परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी सुरक्षतेच्या दृष्टिने इतर ठिकाणी त्वरित स्थलांतर करावे. वेळोवेळी शासनाकडून आलेल्या सुचनांचे काटेकोर पणे पालन करावे. वावेशेख मोहला, लिपणीवावे, मारियामखर, महमदखनिखार गावातील ग्रामस्थानी अश्या परिस्थितीत गावातील प्राथमिक, माध्यमिक शाळा, समाजमंदिरे, गावकीचे घर, जमातीचे घर अश्या सुरक्षतेची खात्री असणाऱ्या ठिकाणी स्थलांतरित होण्याचे आवाहन तहसीलदार घारे यांनी केले.

या प्रसंगी दरडग्रस्त गावातील ग्रामस्थ, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटिल, सर्व समाज अध्यक्ष, मुंबई मंडळातील सदस्य, मंडळ अधिकारी एस. के. शहा, तलाठी आणि मान्यवर उपस्थित होते.



# ट्रान्सपोर्ट ट्रकरच्या धडकेत २२ वर्षीय तरुण जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ट्रान्सपोर्ट ट्रकरचा धक्का लागल्याने २२ वर्षीय तरुणी जखमी झाल्याची घटना तळोजा एमआयडीसीमध्ये घडली आहे. चालक शेर बहादुर यादव यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तळोजा एमआयडीसी येथे राहणारा मोरारी शंकर ठाकूर हा ओम शिवबा ट्रान्सपोर्ट तळोजा एमआयडीसी येथे किन्नरचे काम करतो. शेर बहादुर यादव हा ट्रकर वेल्डिंग साठी घेऊन गेला होता. यावेळी ट्रकर घेऊन परत येत असताना ट्रकर बंद पडले. यावेळी ट्रॅकर समोरील फीडल पंप बटन शेरबहादुर यांनी मोरारी याना दाबण्यास सांगितले असता ट्रकरचा धक्का लागल्याने उजव्या बाजूचा टायर डाव्या खांद्याला घासल्याने मोरारी ठाकूर यांच्या खांद्याला दुखापत झाली. यात त्याचा खांदा फ्रॅक्चर झाला.

# जिजामाता हॉस्पिटल जासई येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर

**दै.रायगड नगरी । उरण**

जिजामाता हॉस्पिटल जासई व सुयश हॉस्पिटल सिवूडस यांच्या संयुक्त विद्यमाने गुरवार दि २८ एप्रिल २०२२ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत उरण तालुक्यातील जिजामाता हॉस्पिटल जासई येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

रुग्णांची बी एम डी,ब्लड शुगर, ब्लड प्रेशर, इसीजी तपासणी मोफत करण्यात येणार आहे. शिवाय हाडांचे आजार -मनक्याचे आजार, गुडघ्याचे आजार, स्त्री रोग -गर्भ पिशवीचे आजार, गर्भाशयाच्या गाठी, पांढरे पाणी जाणे, अनियमित पाळी, मूल न होणे, मूत्र रोग -मूतखडा, प्रोटेस्ट, मूत्र मार्ग विकार, दम्याचे आजार, मधुमेह, कर्करोग, फुफुसाचे आजार आदी आजारावर मोफत मार्गदर्शन तसेच शस्त्रक्रियेची गरज असल्यास ती मोफत व अल्प दरात करण्यात येणार आहे. उपचाराची गरज असणाऱ्या व्यक्तीला सर्व अत्याधुनिक उपकरणांनी युक्त औषधोपचार व शस्त्रक्रिया डॉ लता देराश्री, डॉ धवल देराश्री व जिजामाता हॉस्पिटल स्टाफ तर्फे करण्यात येणार आहे. रुग्णांनी येताना पूर्वीचे सर्व रिपोर्ट, केशरी किंवा पिवळे रेशनकार्ड, आधारकार्ड सोबत आणावे.व या तपासणी शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांमार्फत करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९३२१९३२३८० या नंबर वर संपर्क साधावे.

# शिवसेने तर्फे पाले बुद्रुक येथे जिल्हा स्तरीय भगवा चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील आंबेवाडी जिल्हा परिषद मतदान संघातील कोलाड विभाग कबड्डी असोसिएशनच्या पाले बुद्रुक येथील मैदानावर रविवार दि.१मे २०२२ रोजी संध्याकाळी ५ वा. महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून शिवसेनेचे रोहा तालुक्याचे उपतालुका प्रमुख चंद्रकांत लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेने तर्फे जिल्हा स्तरीय भगवा चषक कबड्डीचे आयोजन करण्यात येणार आहे.

या कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक ५१०००/- रु.व आकर्षक चषक, द्वितीय क्रमांक २५०००/- रु.व आकर्षक चषक, तृतीय क्रमांक १५०००/- रु. व आकर्षक चषक, चतुर्थ क्रमांक १५०००/- रु.व आकर्षक चषक, मालिकावीर सायकल, उत्कृष्ट पक्कड कुलर, उत्कृष्ट चढाई कुलर, पब्लिक हिरो टॉवर फॅन अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. अधिक माहितीसाठी रमेश सानप ७८०९१२२९९९, मिलिंद पवार ९८६०२५०२८७, चंद्रकांत लोखंडे ९४२११६८०३३, ज्ञानेश्वर खांमकर ९९७५६८४७५३ यांच्याशी संपर्क साधावा. सर्व कबड्डी स्पर्धा यशश्विकरण्यासाठी विभाग प्रमुख कुलदीप सुतार, कोलाड परिसरातील शिवसैनिक व सर्व पदाधिकारी मेहनत घेत आहेत.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पोलादपूर तालुक्यात वादळीवाऱ्याचा जोरदार तडाखा

आर्थिक नुकसान ओढवले आहे.पोलादपूर तहसिल कार्यालयातून देण्यात आलेल्या माहितीनुसार तालुक्यात वादळीवाऱ्यामुळे घरे व इमारतींचे नुकसान झाले असले तरी कोठेही मनुष्याला इजा अथवा जिविताची हानी झाली नसल्याचे सांगण्यात आले.

## भेंडखळ खाडीत सोडण्यात येणाऱ्या दुषित पाण्यामुळे हजारो मासे मृत्युमुखी ; प्रशासनाचे दुर्लक्ष

मेलेल्या माशांमुळे व खाडीतील दुषित केमिकल मिश्रीत पाण्याच्या उग्र वासाने रहिवाशांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. तरी महसूल व प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी भेंडखळ गावातील रहिवाशी करत आहेत.

समुद्रातील व खाडीतील मासेमारीवर आप आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत असलेल्या बांधवांवर सध्या उपासमारीचे संकट ओढावले आहे. तसेच खाडीतील दुषित केमिकल मिश्रीत पाण्याच्या उग्र वासाने व खाडीत व नाल्यात मेलेल्या माशांच्या उग्र वासाने भेंडखळ गावातील रहिवाशांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. तरी रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री अदिती तटकरे, कोकण आयुक्त व रायगड जिल्हाधिकारी यांनी या घटनेची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी आणि मासेमारी करणाऱ्या बांधवांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी भेंडखळ गावातील सामाजिक कार्यकर्ते हरेश सुरेश पाटील यांनी एका निवेदनातून केली आहे.

## सीकेटी महाविद्यालयाचा (स्वायत्त) पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ मोठ्या उत्साहात

तुम्ही तुमचे ध्येय पूर्ण करण्यासाठी मोठे स्वप्न उराशी बाळगा आणि स्वतःचे आत्मपरीक्षण करा.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांचे तसेच शिक्षकांचे सुद्धा कौतुक केले. त्यांनी असेही संबोधित केले की, नुसते पुस्तकी ज्ञान महत्वाचे नसून या जगात वावरण्यासाठी सामान्य ज्ञानही महत्वाचे आहे, असा मौलिक सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

या पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्यामध्ये पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ आणि प्रशस्तीपत्र तसेच विद्यावाचस्पती प्राप्त विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ , सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या शानदार समारंभामध्ये एनसीसीच्या पथकाने उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. या सोहळ्याची सुरवात सुरेल स्वागत गीताने झाली. त्यानंतर प्राचार्य मा. प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. तसेच प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. त्यांनी आपल्या भाषणामध्ये महाविद्यालयातील गौरवशाली परंपरांचा आढावा घेतला. या सोहळ्यामध्ये सर्व पालक व गुणवंत विद्यार्थ्यांचे चांगु काना ठाकूर कॉलेजचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी कौतुक केले. तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी परिषद व विद्यार्थी कल्याण कक्षाच्या अध्यक्षा डॉ. एम. ए. म्हात्रे, परीक्षा नियंत्रक डॉ. एस. आय. उन्हाळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्याचे आभार प्रदर्शन परीक्षा नियंत्रक डॉ. एस. आय. उन्हाळे यांनी केले. प्रा. डॉ. आर. व्ही. येवले, प्रा. डॉ. जि. एस. तन्वर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## सिडकोच्या अतिक्रमण विरोधी कारवाईला महाविकास आघाडीसह ग्रामस्थांनी केला विरोध

कसे काय तोडू शकते असा सवाल स्थानिक नगरसेवक रवींद्र भगत यांनी केला तर जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी सुद्धा आक्रमक भूमिका मांडत कोणत्याही परिस्थितीत ही कारवाई करून देणार नाही असा इशारा दिला तर सुदाम पाटील यांनी सुद्धा प्रथम भूमिपुत्रांची देणी सिडकोने द्यावीत मगच अतिक्रमण पाडण्यास यावे असे सांगितले.

ग्रामस्थ आक्रमक होताच परिमंडळ २ चे पोलिस उपायुक्त शिवराज पाटील व कळंबोली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय पाटील यांनी आक्रमक जमावाला शांत करत बेकायदेशीर गॅरेज, जाहिरातफलक व मोबाइल टॉवर यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात आवश्यक त्या सूचना सिडकोच्या अतिक्रमण पथकाला केल्या असता स्थानिक भूमिपुत्रांनी ही कारवाई करण्यासाठी काही दिवसांची मुदतवाढ देण्याची मागणी केली.


**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

Email : mahad.ee@mahapwd.gov.in Ph No. (02145) 222167

**निविदा सूचना क्रमांक ०३ सन २०२२-२०२३**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | बयाणा रक्कम पावती | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रस्ते पुरहानी दुरुस्ती कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत बारसांव शिवथर रस्ता प्र.जि.मा. ७० कि.मी. १४/६०० मध्ये गॅबीयन वॉल बांधणे. तालुका : महाड, जिल्हा : रायगड (पुरहानी दुरुस्ती) | ५१७३१४७ | ५३००० | ५६०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| २ | शिवथरघळ येथील मंदिराच्या मागील बाजूस गॅबियन भिंतीचे बांधकाम करणे. तालुका : महाड, जिल्हा : रायगड (पर्यटन) | ४११०१४७ | ४२००० | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच व वरील |
| ३ | कोळोसे येथील रस्त्याचे बांधकाम करणे. तालुका : महाड, जिल्हा : रायगड (आ.स्था.वि.) | १७७४८५९ | १८००० | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ४ | तहसीलदार निवासस्थानाचे विस्तीत बांधकाम करणे. तालुका : रोहा, जिल्हा : रायगड (डि. पी.डी.सी.) | २८९८५६० | २९००० | ५६०/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| ५ | मौजे : पांगळोली मस्जिद मोहल्ला, ता.म्हसळा येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका : म्हसळा, जिल्हा : रायगड (खा.स्था.वि.) | १३२९३८८ | १४००० | ५६०/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| ६ | मौजे : कुमशेत ग्रामपंचायत कुमशेत, ता.माणगांव येथे बहुउद्देशीय सभागृह बांधणे. तालुका : माणगांव, जिल्हा : रायगड (खा.स्था.वि.) | १३३३७०६ | १४००० | ५६०/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| ७ | मु.वाकण, ता.पोलादपूर गावठाण येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका : पोलादपूर, जिल्हा : रायगड (आ.स्था.वि.) | १११००१५ | १२००० | ५६०/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| १ निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक २८/०४/२०२२ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक १२/०५/२०२२ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा : रायगड यांचे कार्यालयात दिनांक १७/०५/२०२२ वेळ ११.०० वाजता |

टिप :- परिपूर्ण निविदा http//mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/१८९९
दिनांक : २१/०४/२०२
क्रमांक : आरओसी-२०२२-२३/क्र.५/सी ३२३

**सही/-**
**(एम.आर.नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## माजी नगराध्यक्ष मनोज खेडकरांनी साधेपणाने साजरा केला वाढदिवस

**दै.रायगड नगरी । माथेरान**

नेहमीच आपल्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून योजिलेली कामे तडीस नेण्यासाठी कटिबद्ध असणारे माथेरान मधील काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारे माजी नगराध्यक्ष तथा काँग्रेस पक्षाचे कार्यतत्पर अध्यक्ष मनोज खेडकरांनी आपला वाढदिवस समस्त कार्यकर्त्यांसोबत अगदी साधेपणाने साजरा केला.संध्याकाळी खेडकर यांनी कार्यकर्त्यांसोबत ग्रामदैवत श्री पिसारनाथ महाराज मंदिरात जाऊन शिव शंकराच्या पिंडीवर दुग्धभिषेक केला.त्यानंतर पोलीस ठाण्यात सहायक पोलीस निरीक्षक शेखर लव्हे यांनी सुध्दा मनोज खेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापून त्यांचा वाढदिवस साजरा केला.

तर माजी नगरसेवक संतोष लखन यांच्या रेस्टॉरंट मध्ये सुध्दा असंख्य कार्यकर्त्यांसोबत लखन यांनी मनोज खेडकर आणि काँग्रेसच्या युवा कार्यकर्त्या तनिष्का रामाणे यांचाही वाढदिवस मोठया थाटात साजरा केला तसेच गोकुळ रेस्टॉरंट येथे हॉटेल व्यावसायिक भास्कर शिंदे यांनी सुध्दा खेडकर यांचा वाढदिवस केक कापून साजरा केला. मनोज खेडकर यांच्या कार्यपद्धती बाबतीत नागरिकांना पूर्णतः कल्पना असल्याने खेडकर यांनी केलेल्या लोकहिताच्या कामांचा कधीच बडेजाव केला नाही आणि नेहमीच स्वतःहून प्रसिद्धी पासून दूर राहणारे हे एकमेव व्यक्तिमत्व अशीच ओळख त्यांनी निर्माण केली आहे. त्यामुळेच सध्याची परिस्थिती पाहता अन्य पक्षांतील कार्यकर्ते सुध्दा त्यांच्या कार्यप्रणाली वर खुश होऊन काँग्रेस कडे कूच करण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.



## सुगंधी सुपारीच्या १९ गोण्या जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोलीमधील किराणा दुकानदार प्रतिबंधित सुगंधी सुपारीची विक्री करत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती.


या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने कळंबोली सेक्टर २ ई मधील दिवाकर प्रसाद याच्या दुकानात छापा टाकला असता तेथे 'सुप्रीम वाराणसी आशिक' सुपारीच्या १९ गोण्या सापडल्या. याप्रकरणी कळंबोली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पक्षांसाठी भूतदया कडक उन्हात पक्षांना अन्नपाणी व निवाऱ्याची व्यवस्था

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

जिल्ह्यात वाढते वसाहतीकरण व औद्योगिकरण यासाठी जंगलतोड आणि मानवनिर्मित वणव्यांमुळे वनांचा ऱ्हास यामुळे पक्षांचा अधिवास नष्ट होत आहे. पर्यायाने या पक्षांचे अस्तित्व टिकवण्यासाठी अनेक पक्षीप्रेमी व पर्यावरण प्रेमी नागरिक मानवी वस्तीत येणाऱ्या पक्षांची दाण्यापाण्याची व्यवस्था करत आहेत. एप्रिल ते जून हा काही पक्षांचा विणीचा हंगाम असल्याने काही जणांनी तर या पक्षांसाठी घरटी देखील बांधली जात आहेत.

पक्षी इमारती, घरामध्ये, फ्लॅटच्या गॅलरी, लोखंडी पाईप, खिडक्या, पडक्या इमारती व पार्किंग अशा मिळेल त्या ठिकाणी स्वतःचे घरटे बांधुन आपले अस्तित्व टिकविण्यास झगडतांना दिसत आहेत. त्यामुळे येथे त्यांना सुरक्षित निवाऱ्याची व्यवस्था केली जात आहे. विळे येथील पक्षी अभ्यासक राम मुंढे यांची छोटी मुलगी काही दिवसांपूर्वी घराच्या गॅलरीमध्ये उभी होती. तिला चिमणी, दयाळ आणि साळुंख्या गॅलरी मध्ये फिरतांना दिसल्या. तर घराबाहेर दयाळ, साळुंख्या, बुलबुल आणि चिमण्या फिरत होत्या. पक्षांच्या विणीचा हंगाम सुरू होत आहे म्हणून ते घरटे बांधण्याच्या शोधात आहेत व सुरक्षित जागा शोधत होत्या हे मुंढे यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी या पक्षांना राहण्यासाठी सुरक्षित घरटे बनविण्याचे ठरविले. ही घरटी बनवण्यासाठी टाकाऊ वस्तूंचा



उपयोग करण्याचे ठरवले. त्यांनी मित्र निलेश लाड यांचे मेडिकलच्या दुकान गाठले व त्यांना घरट्याची कल्पना दिली. लाड यांनी भरलेल्या बरण्या रिकाम्या करून घरट्यासाठी दिल्या. मुंढे यांनी या प्लास्टिक बरण्यांना नारळाच्या टाकाऊ साली फेविकॉलच्या आधारे चिटकवून, आणि कचऱ्यात टाकून दिलेल्या झाडूचे गवत व काड्यांपासून सुशोभित केले आणि पूर्णतः टाकाऊ वस्तू पासून उत्तम अशी घरटी तयार केली. किमान पाच ते सहा घरटी आणखी बनवून गॅलरी आणि फ्लॅट च्या सर्व खिडक्यांच्या कोपऱ्यात लावली. हे पाहून इतरही अनेकांनी हा उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे.

रोहा तालुक्यातील वांगणी गावात संकल्प मित्रमंडळ व उत्कर्ष मित्रमंडळ ही दोन मंडळे व तेथील तरुण मागील काही वर्षांपासून उन्हाळ्यात पशुपक्षांसाठी पाण्याची व्यवस्था करतात. येथील भिसे खिंड येथे उन्हाळ्यात पशुपक्ष्यांसाठी ठिकठिकाणी रोज २४ तास पिण्याचे पाणी ठेवले जाते. सर्व जलसाठे कोरडे पडल्यावर पशुपक्ष्यांना हे पिण्याचे पाणी संजीवनी ठरते.

जांभूळपाडा येथील पशुपक्षी प्रेमी सचिन मजेठिया हे गेली अनेक वर्षे मोकाट जनावरे व पक्षांसाठी अन्नपाण्याची व्यवस्था करत आहेत. त्यासाठी दुकानाबाहेर छोटा हौद बनवून घेतला आहे. चिमणी, कावळे व इतर अनेक पक्षी त्यांच्या दुकानासमोर दाण्यापाण्यासाठी येतात पाणी पितात व तेथे पाण्यात छान डुंबतात. अनेक कावळे तर त्यांच्या अंगाखांद्यावर खेळतात. पक्षांसाठी थंडगार पाणी मिळावे म्हणून अनेकजण चक्क मातीची भांडी बनवून घेऊन ते परसात व झाडांवर लावतात. पालीतील डॉ. राऊत, पुई–सिद्धेश्वर येथील तरुण गणेश शिंदे व फणसवाडी येथील तरुण निलेश शिंगरे हे मागील वर्षीपासून हा अनोखा उपक्रम राबवित आहेत. तसेच ग्रीन टच नर्सरीचे चालक अमित निंबाळकर यांनी देखील आपल्या नर्सरीमध्ये व घराजवळ झाडांवर पक्षांसाठी घरटी बनवली आहेत. व त्यांना पाण्याची व्यवस्था देखील केली आहे. अशा प्रकारे जिल्ह्यात अनेक लोक उन्हाळ्यात पक्षांसाठी भूतदया दाखवीत आहेत.

# लायन्स क्लब मांडवा बुद्धिबळ स्पर्धेत ३ गटांत १५ जणांनी मारली बाजी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटना यांच्या मान्यतेने व लायन्स क्लब अलिबाग–मांडवा आयोजित, संदीप म्हात्रे पुरस्कृत बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात सन्मिल सुशील गुरव, पंधरा वर्षांखालील गटात शंतनु पेंडसे, तेरा वर्षांखालील गटात अपेक्षा मारभल यांना प्रथम क्रमांक मिळाला. या स्पर्धेत १०३ बुद्धिबळ स्पर्धक सहभागी झाले होते. या बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आले, तर बक्षीस वितरण रायगड जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती दिलीप भोईर आणि इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

झिराड येथील पाठारे क्षत्रिय अष्टागर समाजाच्या तपस्वी रामजी लक्ष्मण घरत समाजमंदिरात रविवारी (दि. २४) आयोजित करण्यात आलेल्या या बुद्धिबळ स्पर्धेप्रसंगी लायन्स क्लब मांडवाचे अध्यक्ष मोहन पाटील, अनिल म्हात्रे, नयन कवळे, उपाध्यक्ष बाळकृष्ण कोळी, सचिव हर्षद पाटील, लायन्स हेल्थ फाऊंडेशन, अलिबागचे उपाध्यक्ष नितीन अधिकारी, रिजन चेअरमन अरविंद घरत, विद्या नितीन अधिकारी, डीसी डायबेटीस स्कनिंग अमिष शिरगावकर, डीसी कम्युनिटी सर्व्हिस धवल राऊत, सुबोध राऊत, सुमित पाटील, अभिजित गुरव, जितेंद्र ठाकूर,जीएमपी नोडल अधिकारी प्रदीप सिनकर, लायन्स क्लब अलिबागचे महेंद्र पाटील, ॲक्टीव्हिटी कोऑर्डिनेटर अरविंद अग्रवाल, स्पर्धेचे समन्वयक सुशील गुरव, चंद्रशेखर पाटील, राष्ट्रीय पंच अमित कदम, राज्य पंच श्रेयस पाटील, रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष विलास पाटील, साहित्यिक उमाजी केळुसकर आदी मान्यवर उपस्थित होते. स्वागतगीत लायन्स क्लब पोयनाडच्या सचिव प्रगती सिनकर यांनी गायिले. उद्घाटनाचे सूत्रसंचालन विवेक तेंडुलकर यांनी केले.

सायंकाळी झालेल्या बक्षीस वितरण प्रसंगी खुल्या गटात प्रथम क्रमांक– सन्मिल सुशील गुरव (अपराजित, ६/६), रु. २०००/– आणि ट्रॉफी, द्वितीय क्रमांक– अविष्कार मारभल (५/६), रु. १५००/– आणि ट्रॉफी, तृतीय क्रमांक– शुभम नांदगावकर (५/६), रु. १०००/– अणि ट्रॉफी, चतुर्थ क्रमांक– साई बलकवडे (५/६), रु. ५००/– आणि ट्रॉफी, पाचवा क्रमांक– अभिषेक ई (५/६), तसेच उत्तेजनार्थ अभिजित गुरव आणि सोफिया घट्टे ( महिला विशेष बक्षीस) यांचा सन्मान करण्यात आला. पंधरा वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक– शंतनू पेंडसे ( ४/४), १५००/– आणि ट्रॉफी, द्वितीय क्रमांक – निमिष वाकडे ( ३/४), रु. १०००/– आणि ट्रॉफी, तृतीय क्रमांक – प्रथमेश जामगे (३/४), रु. ५००/– आणि ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. तेरा वर्षा खालील गटात प्रथम क्रमांक– अपेक्षा मारभल (अपराजित, ५.५/६ )१०००/– आणि ट्रॉफी, द्वितीय क्रमांक– अथर्व वाघ ( ५/६) ७००/– आणि ट्रॉफी, तृतीय क्रमांक– आरोही पाटील (५/६) ५००/– आणि ट्रॉफी, उतेजनार्थ – अनुश्री गुरव (३/५) आणि रिद्धी शेडगे – (२/६) सर्वात लहान मुलगी ४ वर्ष यांचा सन्मान करण्यात आला.



# अखेर सुमितला मिळाला मदतीचा हात ; एक किलो वजनाची काढली गाठ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सुमित दिनानाथ राय हा मुलगा नागोठणे येथील रहिवासी असून लहानपणापासून त्याच्या डाव्या हाताच्या खाली गाठ होती. वयानुरूप ती गाठ वाढत गेली आणि त्यामुळे त्याचा त्रासही वाढत गेला. घराची हलाखीची परिस्थिती त्यात मुलाला होणारा त्रास या सर्व गोष्टीमुळे हताश झालेल्या मुलाच्या पालकांना अमरचंद जेठमल जैन प्राथमिक शाळा– नागोठणे येथील मुख्याध्यापिका– राजेश्री शेवाळे यांनी इयत्ता २ री मध्ये शिकत असलेल्या या विद्यार्थ्याला शालेय आरोग्य तपासणीत संदर्भित केले.



पंचायत समिती– रोहा अंतर्गत गट शिक्षण अधिकारी– सादुराम बांगारे, शिक्षण विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेले समग्र शिक्षा अभियान, समावेशीत शिक्षण विभागातील कार्यरत टीम आणि सर्व साधनव्यक्ती व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था– पनवेल मा. प्राचार्या, तसेच समता विभाग प्रमुख– मा. तुपे सर, व समावेशीत जिल्हा समनव्ययक श्री.विशे सर यांच्या मार्गदर्शनाने व प्रयत्नाने सुमित यास अखेर सर्वांच्या मदतीने डॉ. भुसारे (सर्जन) एम. जी.एम.हॉस्पिटल, कामोठे– पनवेल यांच्या प्रयत्नाने अखेर दि.४/४/२०२२ रोजी पहिली शस्त्रक्रिया पार पडली. जवळपास १ किलो वजनाची गाठ काढण्यात आली. तसेच दुसरी शस्त्रक्रिया दि. १२/४/२०२२ रोजी ही सुद्धा यशस्वीरित्या पार पडली. या यशस्वी शास्त्रक्रिये मुळे सुमितचे पालकही गहिवरले. त्यांच्या डोळ्यातील आनंद अश्रू सर्व काही सांगून गेले. सदर पालक हे परप्रांतीय असून अपूर्ण कागदपत्रांची पूर्तता असल्यामुळे जवळपास एक महिना पासून हॉस्पिटल मध्ये ॲडमिट ठेवले होते. लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता नसल्यामुळे त्यात खूप वेळ गेला. या सर्व अडचणी लक्षात घेऊन विशेष शिक्षक भानुदास आमले सर यांच्या विशेष प्रयत्नांने ही शस्त्रक्रिया अखेर यशस्वी पार पडली. ऑपरेशन झाल्यानंतर अजून काही दिवस हॉस्पिटलमध्ये ठेवणार आहेत. या सर्व गोष्टी पार पाडत असताना जिल्हा रुग्णालय– अलिबाग येथे कार्यरत असलेले पंकज मोरे यांचे वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन लाभले. या सर्वांच्या मदतीचा हात मिळाल्याने व शस्त्रक्रिया यशस्वी पार पडल्याने सुमितच्या पालकांचा व इतरांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे.

### रायगडात बैलगाडा शर्यतीतील अपघात रोखणारा प्रभावी व नवा पॅटर्न ठरतोय लोकप्रिय

# तारेच्या जाळ्या व बांबूचे कम्पाउंड रोखतायेत अपघात



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुप्रीम कोर्टाने मागील ८ वर्षापासून असलेली बैलगाडा शर्यतीवरील बंदी हटवल्यानंतर सबंध महाराष्ट्रातील बैलगाडी शर्यत प्रेमी आनंदून गेले आहेत. बैलगाडा मालक यांच्या आनंदाला देखील पारावार उरला नाही. मात्र आता बैलगाडा शर्यतीत होणारे अपघात हा चिंतेचा विषय बनला आहे. तर यावर रायगड जिल्ह्यातील अनेक आयोजकांनी उपाय देखील शोधून काढलाय. शर्यतीच्या मैदानात दोन्ही बाजूला तारेची जाळी व बांबूचे कम्पाउंड तयार करून स्पर्धा सुरक्षितपणे राबविण्यावर आयोजक भर देतायत. पशुधन टिकवने व जोपासने कामी हा निर्णय महत्वाचा मानला जातोय. मात्र या शर्यतीत होणारे वाढते अपघात चिंताजनक मानले जातायेत.

रायगड़ जिल्ह्यात बैलगाडा शर्यतीत घड़लेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोघांचा बळी गेल्याने या शर्यतीच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित राहिले. शिवाय आयोजकांविरोधात गुन्हे देखील दाखल झाले. त्यामुळे आता जिल्हा प्रशासन देखील बैलगाडा शर्य तीच्या आयोजनाकडे पूर्णपणे लक्ष ठेवत असून शर्यतीच्या आयोजनात नियमावली पाळली जातेय का याकडे गांभीर्यपूर्वक पाहिले जातेय, शिवाय उधळलेले बैल प्रेक्ष् कात शिरकाव करणार नाहीत, अथवा अतिउत्साही प्रेक्षक स्पर्धेवेळी मैदानात येणार नाहीत याकडे आयोजकांनी विशेष लक्ष दिलेय. सुरक्षेच्या दृष्टीने बैलगाडा शर्यतिचे मैदानाच्या दोन्ही बाजूला तारेच्या जाळ्या व सुरक्षित कम्पाउंड केले जातेय. व बैलगाडा प्रेमी, प्रेक्षक यांना दुरून या स्पर्धेची मजा घेण्याचे आवाहन केले जातेय.

तसेच रुग्नवाहिका व पशुवैद्यकीय अधिकारी देखील उपस्थित राहत आहेत. यावेळी पोलिस बंदोबस्त देखील ठेवला जातोय, या उपाय योजनांमुळे आता शर्यतीदरम्यान कोणताही अपघात घडत नाही. असे समोर आले आहे. बैलगाडा शर्यतीतील अपघात हा रोखनारा नवा पैटर्न संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेचे लक्ष वेधुन घेतोय. महाराष्ट्रात बैलगाडा शर्यत सुरक्षेच्या या पद्धतीने पार पडल्यास अपघाताला आळा बसणार असल्याचे मत ज्येष्ठ जाणकार व तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत.

# विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

रोहा तालुक्यातील पुगांव येथे सालाबाद प्रमाणे २४ एप्रिल २०२२ रोजी 'पंचायती राज दिन' ग्रामपंचायत पुगाव येथे साजरा करण्यात आला.या अगोदर केंद्र व राज्य शासनानी ११ ते १७ एप्रिल २०२२ हा सप्ताह आयकॉनीक सप्ताह साजरा करण्यात आला.

या सप्ताहामध्ये ग्रामपंचायत पुगांव येथे शाश्वत विकास ध्येयांच्या बालस्नेही गाव,जल समृद्ध गाव, स्वच्छ व हरित गाव या संकल्पना निवडले आहेत त्यावर ग्रामपंचायत वर्षभर काम करणार आहे त्या संकल्पनेतून ग्रामपंचायत पुगाव यांनी रा.जि.प. केंद्र शाळा पुगाव येथे पोस्टर, निबंध, वकृत्व स्पर्धाचे आयोजन केले होते त्यामध्ये काही विध्यार्थी नी बाल स्नेही गाव, जल समृद्ध गाव, स्वच्छ व हरित गाव विषयांवर पोस्टर तयार केले होते काही विध्यार्थीनी निबंध व वकृत्व स्पर्धेत भाग घेतला होता.या स्पर्धेत १ ते ३नंबर आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा रविवार दि.२४ एप्रिल २२ रोजी सत्कार करण्यात आला.

यावेळी वक्तृत्व स्पर्धेत मुग्धा चंद्रकांत अधिकारी प्रथम इयत्ता २री, स्वरा मधुकर कळमकर द्वितीय इयत्ता ३ री, शुभ्रा उमेश तळकर तृतीय इयत्ता २री,निबंध स्पर्धेत अक्षरा नंदकुमार कळमकर प्रथम इयत्ता ३री, अथर्व श्रीकांत दिघे द्वितीय इयत्ता ४ थी, ज्ञानेश्वरी सुबोध देशमुख तृतीय इयत्ता ४थी,पोस्टर स्पर्धेत प्रज्वल बबन येलकर प्रथम इयत्ता ३री, अदिती प्रमोद देशमुख द्वितीय इयत्ता ४ थी, जय गणेश सुतार तृतीय इयत्ता ४ थी या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी ग्रामपंचायत पुगाव सरपंच नेहाताई म्हसकर, उपसरपंच राम धुपकर, सदस्य गणेश म्हसकर, नारायणराव धनवी जेष्ठ नेते, बबन म्हसकर, विश्वनाथ आधिकारी,विठ्ठल येलकर गुरुजी, केशव आधिकारी, वैदेही तळकर नीळकंठ कदम शिक्षक, म्हात्रे ग्रामसेविका,सुरेश घोगले,आनंता घोगले शिपाई,असंख्य ग्रामस्थ व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत पुगाव यांच्या मार्फत सत्कार करण्यात आला.




मुजावर साो.कोर्ट

अॅड.महेश प्र. देशपांडे

**जाहीर नोटीस**

मा.श्री.मुजावर ७ वे सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर पनवेल, जि.रायगड

कि.दि.चौ.अर्ज क्रं.१९५४/२०२१

नि.नं.९/ड

ने.ता.६/६/२०२२

करण जाधव व इतर वि.कोणीही नाही

ज्यापेक्षा श्रीमती.हर्षदा चंद्रकांत जाधव ह्या दि.२४/०९/२०२० रोजी मिरा भायदंर, जि.ठाणे येथे मयत झालेल्या आहेत.

अर्जदार १) करण पि. चंद्रकांत जाधव वय : २६ धंदा : जिम ट्रेनर, रा.सदनिका क्र.२०२, दुसरा मजला, प्रभाकर अपार्टमेंट, बेकारी गल्ली, भायंदर (प), मुंबई–४०११०१ २) निकिता पि.चंद्रकांत जाधव वय : २४, धंदा : घरकाम रा.सदर इतर वारस–कोणीही नाही

मिळकतीचे वर्णन : सदनिका क्र.१०५, पहिला मजला, जयशक्ती कॉम्प्लेक्स को.हौ.सो., प्लॉट नं.६८, फेस २, नावडे, पनवेल, जि.रायगड

यांनी या न्यायालयात मयताचे कायदेशीर वारस आहेत असे घोषित करून वारस प्रमाणपत्र मिळावे यासाठी अर्ज केला आहे. ज्यापेक्षा अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास न्यायालयाला समजावयाचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात स्वतः हजर राहून हरकत दाखवावी. सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदारांनी त्यांच्या हक्काबद्दल पुरावा दिल्यास व तो न्यायालयास योग्य वाटल्यास त्यांना मयताचे कायदेशीर वारस आहेत असे घोषित करून त्यांना मयताचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

प्रमाणपत्र आवश्यकता : अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून अर्जदारास शासकीय कामासाठी व निमशासकीय कामाकरिता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

आज दि.२६/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : भिलवले, ता.खालापूर, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकतीबाबत खालील जमिनीचे मालक यांचे सोबत श्री.प्रकाश नानुभाई कोठारी यांनी व्यवहार करून खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : भिलवले, ता.खालापूर, जि.रायगड येथील मिळकत**

| जमीन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) श्री.लखमा कानु कातकरी<br>२) श्री.नथु कानु कातकरी<br>३) सौ.नवशा कानु कातकरी<br>४) सौ.भिमी सखाराम कातकरी | ११ | १/ब | ०.३४.५०<br>पो.ख.०.०५.३०<br>एकूण क्षेत्र ०.३९.८०<br>एवढ्या क्षेत्राबाबत | २.१२ |

सदर मिळकतीबाबत सदर पेपर नोटीस प्रकाशित करणार यांनी दि.२७/०९/२००८ रोजी व्यवहार करून मिळकत खरेदी करण्याचे ठरविले असून त्याप्रमाणे सदरील मिळकत नावे करण्यासाठी कायदेशीर परमिशन / परवागनी मिळण्यासाठी प्रक्रिया चालू केली आहे. तरी सदर परमिशन लवकरच मिळणार आहेत. त्यामुळे सदरील मिळकतीबाबत अन्य कोणत्याही त्रयस्थ इसमांनी सदर मिळकतीमध्ये व्यवहार व करार, मदार करू नये याची खबरदारी घ्यावी. सदर मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारांस कोणाही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, पोटगी, लिज, लीएन, सदर मिळकतीतून जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे.

दि.२६/०४/२०२२

सही/–
**प्रकाश नानुभाई कोठारी**
रा.नानुभाई कोठारी, १०/ए, सुंन्दत्ता अपार्टमेंट, फ्लॅट नं.१, तळमजला, माऊंट प्लीजंट रोड, मलबार हिल, मुंबई–४००००६
मो.नं.९८२१०५७१०२



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : भिलवले, ता.खालापूर, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकतीबाबत खालील जमिनीचे मालक यांचे सोबत श्री.प्रकाश नानुभाई कोठारी यांनी व्यवहार करून खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : भिलवले, ता.खालापूर, जि.रायगड येथील मिळकत**

| जमीन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) सौ.दवारकी अनंता पिरकट<br>२) श्री.दिपक अनंता पिरकट<br>३) सौ.गौरीबाई राजू पारधी<br>४) सौ.पार्वती अनंता पिरकट<br>५) सौ.पारुबाई मंगेश शिद | ६२ | ६/१०/ड | ०.३१.९०<br>पो.ख.०.००.६०<br>एकूण क्षेत्र ०.३२.५०<br>एवढ्या क्षेत्राबाबत | ०.४१ |
| १) श्री.गोविंद धर्मा सांबरी<br>२) सौ.कमळी पदू चौधरी<br>३) सौ.धाकी बबन चौधरी<br>४) सौ.धर्मीबाई धर्मा सांबरी | ६२ | ६/१०/क | ०.२२.६०<br>पो.ख.०.००.४०<br>एकूण क्षेत्र ०.२३.००<br>एवढ्या क्षेत्राबाबत | ०.४० |
| १) सौ.नामी आकु सांबरी<br>२) श्री.एकनाथ आकु सांबरी<br>३) सौ.सुमन गोमा सांबरी<br>४) सौ.मीना गोमा सांबरी<br>५) सौ.सोनी नामदेव सांबरी<br>६) कु.दिनेश नामदेव सांबरी अ.पा.क.आई सोनी नामदेव सांबरी | ६२ | ६/१०/ब | ०.२६.५०<br>पो.ख.०.००.५०<br>एकूण क्षेत्र ०.२७.००<br>एवढ्या क्षेत्राबाबत | ०.३४ |

सदर मिळकतीबाबत सदर पेपर नोटीस प्रकाशित करणार यांनी दि.२७/०९/२००८ रोजी व्यवहार करून मिळकत खरेदी करण्याचे ठरविले असून त्याप्रमाणे सदरील मिळकत नावे करण्यासाठी कायदेशीर परमिशन / परवागनी मिळण्यासाठी प्रक्रिया चालू केली आहे. तरी सदर परमिशन लवकरच मिळणार आहेत. त्यामुळे सदरील मिळकतीबाबत अन्य कोणत्याही त्रयस्थ इसमांनी सदर मिळकतीमध्ये व्यवहार व करार, मदार करू नये याची खबरदारी घ्यावी. सदर मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारांस कोणाही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, पोटगी, लिज, लीएन, सदर मिळकतीतून जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे.

दि.२६/०४/२०२२

सही/–
**प्रकाश नानुभाई कोठारी**
रा.नानुभाई कोठारी, १०/ए, सुंन्दत्ता अपार्टमेंट, फ्लॅट नं.१, तळमजला, माऊंट प्लीजंट रोड, मलबार हिल, मुंबई–४००००६
मो.नं.९८२१०५७१०२

# संक्षिप्त...

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील जावळे गाव पनवेल येथे राहणाऱ्या एका १४ वर्षीय तरुणीचे अपहरण झाल्याची फिर्याद तिच्या नातेवाईकांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यानुसार पनवेल शहर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीच्या विरो–धात अपहरणाचा गुन्हा दाखल केला असून त्या तरुणीचा शोध सुरु केला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पनवेल तालुक्यातील जावळे गाव येथे राहणारी १४ वर्षीय मुलगी आपल्या राहत्या घरातून सकाळी सकाळी सात ते तीन वाजण्याच्या सुमारास बेपत्ता झाली. हि मुलगी त्यांच्या राहत्या घरातून कोणाला काहीही न सांगता निघून गेलेली आहे. व अद्यापपर्यंत घरी परत न आल्याने तिला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले असावे अशी नोंद पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मात्र तिच्या घरातील व्यक्तींनी सर्व ठिकाणी शोध घेतला असता ती सापडली नाही. अखेर तिच्या घरातील व्यक्तींनी पनवेल शहर पोलीस ठाणे गाठत, अज्ञाताने तिचे अपहरण केल्याची तक्रार देण्यात आली आहे. पोलिसांनी तक्रारीनुसार सदर मुलीचा रंग सावळा, उंची पाच फूट, केस लांब काळे, डोळे काळे, नाक सरळ, कपाळावर गोंदलेले, पायात सँडल, अंगात पिवळ्या रंगाचा लाल फ्रॉक घातलेला असे वर्णन आहे. या वर्णनाची तरुणी कोठे आढळून आल्यास पनवेल शहर पोलिसांशी संपर्क साधावा. याबाबत अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश फरताडे हे करीत आहेत.

## तरुणाची आत्महत्या?

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदा कॉलनी येथील तलावात २९ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. स्वस्तिक भोईर (पळस्पे) असे मृत तरुणाचे नाव आहे.

खांदेश्वर पोलिसांना खांदेश्वर तलावात एका तरुणाचा मृतदेह असल्याची माहिती देण्यात आली.

पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता स्वस्तिक भोईर याचा मृतदेह असल्याची माहिती मिळाली. त्याने दारूच्या नशेत आत्महत्या केली असल्याची माहिती समोर आली


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# माथेरान घाटरस्त्याची पावसाळ्यापूर्वी स्वच्छता करावी

## जेष्ठ नागरिक चंद्रकांत सावंत यांचे नगरपरिषदेला निवेदन

**दै.रायगड नगरी । माथेरान**





माथेरानला येण्यासाठी अन्य पर्यायी व्यवस्था नसल्याने सध्यातरी नेरळ मार्गे माथेरान हाच एकमेव घाटरस्ता उपलब्ध आहे त्यामुळे अनेकदा पावसाळ्यात या घाटरस्त्यात दरडी कोसळण्याचे प्रकार काही प्रमाणात होत असतात.मुख्य तीन वळणावर मोठया दरडी आहेत त्या अद्यापही काढल्या नाहीत आणि या धोकादायक भागांना संरक्षक जाळ्या सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बसविण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे अतिवृष्टीमुळे एखादी दरड कोसळली तर जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

माथेरान –नेरळ घाटरस्त्यातील सुटावलेल्या दरडींना संरक्षक भिंत वेळीच घालणे व दरड प्रतिबंधात्मक उपाय योजना त्वरित करणे तसेच या घाटात अनेक ठिकाणी दगड, माती व झुडपांनी भरलेल्या मोऱ्या व गटारे पावसाळ्यापूर्वी स्वच्छ व साफ करून घ्याव्यात जेणेकरून पावसाचे प्रचंड वाहते पाणी या गटारातून वाहत जाऊन घाटरस्त्याची हानी कमी प्रमाणात होईल.

या दोन्ही गंभीर समस्या सोडविण्या विषयीचे निवेदन माथेरान मधील दक्ष, जेष्ठ व अनुभवी नागरिक चंद्रकांत लक्ष्मण सावंत यांनी माथेरानच्या मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक सुरेखा भणगे यांच्याकडे २५ एप्रिल रोजी सुपूर्द केले.

तर मागील वर्षी माथेरान वनसंवर्धन समिती सदस्य, सामाजिक कार्यकर्ते नितीन विश्वनाथ सावंत यांनीही याबाबत शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी पाठपुरावा केला होता परंतु आजतागायत याठिकाणी दरडीसाठी संरक्षक जाळ्या लावण्यात आलेल्या नाहीत.

चंद्रकांत सावंत यांनी निवेदन दिले त्यावेळी प्रशासक सुरेखा भणगे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत वरील गंभीर समस्या तातडीने सोडविण्यासाठी वेळेत प्रयत्न केले जातील असे आश्वासन दिले.

# कंपनीची बनावट सही व बनावट लोगो व चेक तयार करून केली फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मेडीएक्स ए मेंबर ऑफ मेडीएक्स ग्रुप या कंपनीचा बनावट सही व लोगो तयार करून त्याद्वारे बनावट चेक करून फसवणूक करत असताना दोघे जण मिळून आले. प्रतिक विजय पाटणकर (राहणार विचुंबे) आणि अमित सुभाष पाटील (राहणार आवळीपाडा, अलिबाग) यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

मेडीएक्स कंपनीत सौरव वेद हे चीफ ऑपरेटिंग ऑपरेटर म्हणून काम करतात. त्यांची कंपनी हॉस्पिटल डिझाइनिंग चे काम करते. २१ मार्च एप्रिल रोजी त्यांना तळोजा एमाडिसी येथून अक्षय दोशी यांनी फोन करून सांगितले की राजेश थळे नावाचा मॅनेजर कंपनीत आला असल्याचे सांगितले. यावेळी कंपनीत राजेश थळे नावाचा कोणताही व्यक्ती नसल्याचे मनीष कोठारी यांनी सांगितले. व कंपनीने कोणत्याही प्रकारचा व्यवहार केला नसल्याचे सांगितले. २२ एप्रिल रोजी मनिष कोठारी यांनी सौरव वेद यांना सांगितले की, थळे नावाची व्यक्ती अक्षय दोशी यांना भेटण्यासाठी येणार आहे. त्यामुळे सौरव वेद हे कंपनीचे गोडाऊन असलेल्या तोंडरे गाव येथे जाऊन अक्षय दोशी यांना भेटले व तेथेच थांबले. त्यानंतर अक्षय दोशी यांना भेटण्याकरता त्यांच्या कंपनीत दोन इसम आले. व राजेश थळे नावाच्या व्यक्तीने ५५ लाख रुपयांचा एचडीएफसी बँकेचा मेडीएक्स या कंपनीचा बनावट सही केलेला चेक दिला. त्यानंतर अक्षय दोशी यांनी हाक मारून सौरव वेद यांना बोल–ावून घेतले व त्या व्यक्तींना ओळख दाखवल्यानंतर त्यांनी फसवणूक केल्याचे लक्षात आले. व ते घाबरून पळून जात असताना अक्षय दोशी यांचे कंपनीतील कामगारांनी त्यांना पकडले. त्यावेळी त्यांनी त्यांचे नाव प्रतीक विजय पाटणकर (राहणार विचुंबे) व अमित सुभाष पाटील (राहणार आवळीपाडा, अलिबाग) असे सांगितले. दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# प्रजापिता ब्रम्हकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या बाईक रॅलीचे नागोठण्यात उत्स्फूर्त स्वागत

**दै.रायगड नगरी । नागोठणे**



व्यसनमुक्ती व व्यसनमुक्तीच्या जनजागृतीसाठी राजस्थान मधीन माउंट आबू येथील प्रजापिता ब्रम्हकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालय या अध्यात्मिक संस्थेकडून राजभवन–मुंबई ते रोहा दरम्यान आयोजित आजादी के अमृत महोत्सव से स्वर्णिम भारत की ओर या व्यसनमुक्ती व शांततेचा संदेश देणाऱ्या दुचाकी रॅलीचे नागोठण्यात रविवारी(दि.२४) सायंकाळी उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते राजभवन येथे १ मार्च, २०२२ रोजी झेंडा दाखवून या बाईक रॅलीला सुरुवात करण्यात आली होती.

यानिमित्ताने नागोठण्याची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता मंदिराच्या प्रांगणातील व्यासपीठावर संपन्न झालेल्या रॅलीच्या सांगता कार्यक्रमात देवस्थान विश्वस्त समितीचे सचिव भाई टके यांच्याकडून बाईक रॅलीत सहभागी झालेल्या प्रजापिता ब्रम्हकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालय अध्यात्मिक संस्थेच्या वरिष्ठ बी.के.तारा दीदी, भाऊ–बहिण यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी राजिप सदस्य किशोर जैन, रोहा तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र धात्रक, माजी सरपंच विलास चौलकर, पिगोंडे ग्रामपंचायतीचे सरपंच संतोषभाई कोळी, नागोठणे उपसरपंच मोहन नागोठणेकर, पोलीस उपनिरीक्षक नारायण चव्हाण, प्रथमेश काळे, नागोठणे ग्रा.पं.सदस्य सुरेशशेठ जैन, ज्ञानेश्वर साळुंखे, वांगणी ग्रा.पं. सदस्य प्रमोद जांबेकर, धनंजय जगताप आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

संस्थेच्या पनवेल केंद्राच्या प्रमुख बी.के. तारा दीदी यांनी यावेळी संस्थेचा परिचय व राजयोगाद्वारे सुखमय जीवन याविषयी माहिती दिली. परेल केंद्राच्या प्रमुख बी.के.भावना दीदी यांनी रॅलीचा मुख्य उद्देश राजयोग मेडीटेशनचे महत्व सांगितले. या कार्यक्रमाच्या सुरुवा–तीलाच रिद्धी–सिद्धी ग्रुपने उत्कृष्ट असे स्वागत नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन चुनाभट्टी केंद्राच्या बी.के. सपना दीदी यांनी केले. तर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेच्या सर्व भाऊ–बहिणींनी सहकार्य केले. दरम्यान तत्पूर्वी या दुचाकी रॅलीचे रविवारी(दि२४) सायंकाळी ४.३० वा. नागोठण्यातील छ. शिवाजी महाराज चौकात नागोठण्याचे उपसरपंच मोहन नागोठणेकर व ग्रा.पं. सदस्य सुरेश जैन यांच्याकडून स्वागत करण्यात आले. नंतर संस्थेच्या पनवेल केंद्राच्या वतीने याठिकाणी व्यसनमुक्तीवर प्रबोधनात्मक असे सुंदर पथनाट्य सादर करण्यात आले. यामध्ये संस्थेच्या मुंबई केंद्रातून आलेल्या भाऊ–बहिणी सहभागी झाल्या होत्या. छ. शिवाजी महाराज चौक मध्ये उपस्थित सर्वांनी या पथनाट्याला उस्फुर्त दाद दिली.

# जिंदाल कंपनीच्या समोरील अतिउंच गतिरोधकामुळे अपघाताचा धोका ; गतिरोधक हटविण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । नागोठणे**



महामार्गावर नागोठणे ते कोलाड या दरम्यानच्या अंतरामध्ये अनेक ठिकाणी मोठ मोठे गतिरोधक टाकण्यात आले आहेत. यापैकी सुकेळी येथील जिंदाल कंपनीच्या समोरच असलेल्या गतिरोधकाची उंची क्षमतेपेक्षा जास्त असल्याने तसेच तदयावरील पांढ–या रंगाचे पट्टे स्पष्ट दिसत नसल्यामुळे या गतिरोधकावरुन वाहनांचे मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत. त्यामुळे हा गतिरोधक हटविण्याची मागणी वाहनचालक व स्थानिक नागरीकांनी केली आहे.

जिंदाल कंपनीच्या समोरच दोन ते तीन गतिरोधक टाकण्यात आले आहेत. हे गतिरोधक क्षमतेपेक्षा जास्त उंचीचे असुन त्यांच्यावर मारण्यात आलेले पांढ–या रंगाचे पट्टे दिसून येत नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळेस येणाऱ्या– जाणा–या वाहनांना हे पांढ–या रंगाचे पट्टे दिसत नसल्याने सद्यस्थितीत वाहनचालकांना गतिरोधकाचा अंदाज येत नसल्यामुळे वाहने या गतिरोधकावर जोरात आदळुन बरेच अपघात घडत आहेत. त्याचप्रमाणे वाहनांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

गेल्या काही दिवसांमध्ये दुचाकीस्वार तसेच चारचाकी वाहनांचे याठिकाणी अपघात होऊन अनेक जण जखमी झाले आहेत.

त्यामुळे अपघाताला आमंत्रण देणारे अंत्यंत धोकादायक गतिरोधक हटविण्याची मागणी येथील जागरूक नागरिक राजेंद्र कोकळे यांनी केली आहे

# क्षुल्लक कारणावरून त्रिकुटाची टॅक्सी चालकास मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

क्षुल्लक कारणावरून बुलेट मोटारसायकलीवरून आलेल्या एका त्रिकुटाने खारघर से ३० मध्ये राहणाऱ्या कनवलजीतसिंग भुपेंद्रसिंग धारिवाल नावाच्या ३० वर्षीय टॅक्सीचालकास मारहाण करण्याची घटना कळंबोली येथील मिर्ची हॉटेल समोर घडली.

याबाबत टॅक्सीचालक धारिवाल याने कळंबोली पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी तिघा जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

टॅक्सीचालक कनवलजीत धारिवाला हा आपल्या मित्रासह मुंबई येथे जात असतांना कळंबोलीतील मिर्ची हॉटेल समोरील रोडवर बुलेटवरून आलेल्या सदर त्रिकुटाने धारिवाल याच्या टॅक्सीसमोर आपली बुलेट आडवी लावली. याबाबत धारिवाल याने सदर बाबतचा जाब विचारला असता, उपरोक्त तिघा जणांनी त्यास मारहाण करून पलायन केले.

# म्हसळा शहरातील १० वाडी-वस्त्यांच्या नावांत होणार बदल

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

पूर्वापार आणि पारंपरिक पद्धतीने गाव, शहर वाडी–वस्तीत ज्या जातीची लोकवस्ती एकत्रितपणे वास्तव्यास असायची त्या वाडीवस्तीला त्या त्या जातींच्या नावाने ओळखले जायचे किंबहुना तोच नामोल्लेख होऊन त्या वाडीवस्तीची ओळख होत असले नुसार आजतागायत राज्यातील अनेक शहरातील व ग्रामीण भागातील गावांची व रस्त्यांची नावे जातीवाचक आहेत. म्हसळा शहरात नगरपंचायतीच्या ६ प्रभागातील १० वाडीवस्तीची शासन स्तरावर जातीवाचक नावे बदलुन त्या ठिकाणी महापुरुषांची नावे देण्यात येणार असल्याचे समजते.

म्हसळा शहरातील प्रामुख्याने समाजनिहाय लोकवस्ती असलेल्या ब्राह्मण आळी, तांबट आळी, सोनार आळी, म्हसळा बौद्धवाडी, गवळवाडी, सावर गवळवाडी, सावर बौद्धवाडी कुंभारआळी, बेलदारवाडी अशी जा–तीवाचक वाडी वस्तीची प्रामुख्याने ओळख आहे आता या जातीवाचक नावात बदल घडवून आणण्यासाठी शासन स्तरावर जातीवाचक नावे बदलून अशा जातीवाचक नावांऐवजी लोकशाही मुल्यांशी निगडीत महापुरुषांची नावे देण्यासाठी शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२९ / प्र.क्र.३३३ / अजाक, दिनांक ६/५/२१ नुसार म्हसळा शहरातील वरील उल्लेख केलेल्या वाडीवस्तीची नावे बदलुन नवीन नावे देण्यासंदर्भातील कार्यवाही मा.जिल्हा अधिकारी रायग–अलिबाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असल्याचे समजते. म्हसळा नगर पंचायतीने शहरात प्रामुख्याने १० वाडीवस्तीची नावे जातीवाचक असल्याचे मा.सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय रायगड अलिबाग यांना पत्र पाठवून कळविले असल्याचे समजते.

# संजय गांधी निराधार अनुदान योजनांतर्गत १७ प्रकरणे मंजूर

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यासाठी संजय गांधी निराधार योजना समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने समितीच्या अध्यक्षतेखाली तहसीलदार कार्यालय उरण येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी नवनियुक्त समितीचे अध्यक्ष मनोज वासुदेव भगत व सदस्य तसेच शासकीय सदस्यांचे स्वागत करण्यात आले.

विशेष सहाय्य योजनेंतर्गत संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ सेवा राज्य योजना, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब अर्थ सहाय्य आदी योजना बाबत नायब तहसीलदार संदीप खोमणे यांनी माहिती दिली. नायब तहसिलदार संदीप खोमणे, संजय गांधी निराधार योजना समिती अध्यक्ष मनोज भगत सदस्य भावना म्हात्रे, आरती चोगले, यशवंत घरत, सुनील तांडेल, समाधान म्हात्रे यांच्या उपस्थितीत समितीची बैठक होऊन, संजय गांधी निराधार योजना, राष्ट्रीय कुटूंब अर्थसहाय्य योजना आदी लाभार्थ्यांच्या प्रकरणांना मंजूरी देण्यात आलेली आहे.

संजय गांधी निराधार अनुदानयोजना समिती समोर एकूण ३४ प्रकरणे मंजुरीसाठी ठेवण्यात आली होती. संजय गांधी निराधार योजनेची एकूण २९ प्रकरणे त्यापैकी१७ प्रकरणे परिपूर्ण असून १२ प्रकारांमध्ये काही कागद पात्रांची पूर्तता नसल्याने त्या बाबत पूर्तता करून घेऊन मंजूर करण्यात येतील. श्रावण बाळ निराधार योजनेची एकूण ५ प्रकरणे असून त्या पैकी २ प्रकरणे परिपूर्ण आहेत.

उर्वरित ३ प्रकरणामध्ये कागद पत्रांची पूर्तता करून घेऊन मंजूर करावीत असे एकमताने ठरविण्यात आले उरण नायब तहसिलदार संजय खोमणे यांनी संजय गांधी योजना समिती अध्यक्ष व उपस्थित सर्व सदस्य यांचे आभार मानून बैठक समाप्त झाल्याचे घोषित केले

# कोकण विभागात हिवताप निर्मूलनाचे उत्तम कार्य : डॉ.गौरी राठोड

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**



कोकण विभागात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या हिवताप विभागाने उत्तम कार्य करून हिवताप आटोक्यात आणला. कोरोना काळातही क्षेत्रीय स्तरावर उत्तम काम केले. असे उद्गार मुंबई मंडळ ठाणे आरोग्य विभागाच्या उप संचालक डॉ. गौरी राठोड यांनी काढले.

जागतिक मलेरिया दिनाचे (२५ एप्रिल) औचित्य साधून कोविड काळात विशेष कामगिरी करणाऱ्या एमपीडब्ल्यू आणि एलएचव्ही या कोविड योध्यांचा प्रशस्ती प्रमाणपत्र आणि सन्मान चिन्ह देऊन गौरव करुन महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत वाशी येथील विष्णूदास भावे नाट्यगृहात जागतिक मलेरिया दिवस साजरा करण्यात आला.

जागतिक मलेरिया दिन हा मलेरिया प्रतिबंध, नियंत्रण आणि या आजाराचे निर्मूलन या गोष्टींबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो. या निमित्ताने लोकांमध्ये मलेरियाबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जातो. अनेक कार्यक्रम, मोहिमा राबवल्या जातात. दरवर्षी हा दिवस साजरा करण्यासाठी एक खास थीम ठेवली जाते. या वर्षीच्या मलेरिया दिनाची थीम 'मलेरिया रोगाचा भार कमी करण्यासाठी आणि जीव वाचवण्यासाठी नवकल्पना वापरणे' (Harness Innovation to Reduce Malaria Disease Burden and Save Lives) ही होती. आरोग्य विभागामार्फत आयोजित या कार्यक्रमात पालघर, ठाणे आणि रायगड विभागातील एमपीडब्ल्यू आणि एलएचव्ही या कोविड योध्यांचा प्रशस्ती प्रमाणपत्र आणि सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास हार्ट टू हार्ट फाऊन्डेश्नचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी हार्ट टू हार्ट फाऊन्डेशनचे विश्वस्त श्री.रविकुमार व डॉ. जयकर यांनी कोकण विभागाच्या मलेरिया विभागाला मायक्रोस्कोप आणि स्लाईड्स भेट दिल्या. कार्यक्रमाला प्रायोजक म्हणून नवी मुंबईच्या अपोलो हॉस्पिटलचे सहकार्य लाभले.

आरोग्य विभागाच्या या राज्यस्तरीय सोहळयाच्यावेळी सहसंचालक डॉ. स्वप्निल काळे, सह संचालक कृष्ठरोग डॉ. मिलिंद रेगे, कोकण विभाग आरोग्य सेवेचे सहायक संचालक डॉ. बी. एस. सोनावणे, मुंबई मंडळ ठाणे आरोग्य विभागाच्या उप संचालक डॉ. गौरी राठोड, कोकण विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, पनवेल उप जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संकपाळ, डॉ. आरती धुमाळ, प्रसिध्द व्यवसाईक श्री. व सौ. जयस्वाल, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. भोसले, डॉ. नागरे आदि मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. त्रिलोचना धनके यांनी केले तर मान्यवरांचे आभार प्रदर्शन कोकण भवनचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश धुमाळ यांनी केले.